# उष्माघाताच्या रुग्णांसाठी औषधसाठा, खाटाही राखीव

## नागरिकांना दक्षतेचे आवाहन

**लोकसत्ता वार्ताहर**





**कराड :** उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस तीव्र होत असून, तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने उष्णतेचा तीव्र फटका लोकांना बसू लागला आहे. या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना करत येथील वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात उष्माघाताच्या रुग्णांसाठी विशेष व्यवस्था केली आहे. आवश्यक औषधसाठा व वातानुकूलित विभागात खाटासुध्दा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

बारमाही नद्या आणि बागायती क्षेत्रासाठी ओळख असलेल्या कराड तालुक्यातही उष्णतेची लाट जाणवत आहे. एप्रिलमध्येच तापमान ४० अंशांवर गेल्याने मे महिन्यात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. परिणामी उष्माघाताचे रुग्ण वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे.

**वैद्यकीय अधीक्षकांचे आवाहन**

वेणूताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनीता लाळे म्हणाल्या की, उष्णतेमुळे त्रास जाणवणाऱ्या रुग्णांसाठी स्वतंत्र खाटा तसेच आवश्यक औषधे आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध ठेवण्यात आल्या आहेत.

दुपारी १२ ते सायंकाळी चार या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळा, दिवसभरात भरपूर पाणी प्या, काकडी, खरबूज यांसारखी पाण्याचे प्रमाण जास्त असलेली फळे खा, लिंबूपाणी, ताक, कोकम सरबत यांचा आहारात समावेश करा, चहा, कॉफी व साखरयुक्त शीतपेये कमी घ्या. सैल, सुती, फिकट रंगाचे कपडे परिधान करा. उन्हात डोके झाकण्यासाठी टोपी किंवा स्कार्फ वापरा, गॉगल लावा, पुरेशी झोप घ्या, शिळे अन्न टाळा असे आवाहन डॉ. लाळे यांनी केले.

तापमान वाढत असल्याने नागरिकांनी अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. तीव्र डोकेदुखी, उलट्या, अंगात गोळे येणे अशी लक्षणे दिसल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असेही आवाहन त्यांनी केले आहे.

# हुतात्मा सहकारी साखर कारखाना सभासद, शेतकऱ्यांचे आंदोलन

## वैभवकाका नायकवडी यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** हुतात्मा सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा आणि कारखान्यावरील कर्ज स्वतः वैभवकाका नायकवडी यांनी फेडावे यासाठी गेले दहा दिवस किरण नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली कारखाना कार्यस्थळावर आंदोलन सुरू आहे. कारखान्यावर आर्थिक बोजा होण्यास अध्यक्ष नायकवडी आणि त्यांचे नातलगच कारणीभूत असून कारखान्याचे पैसे अन्य ठिकाणी वळविल्याने हा बोजा झाला असल्याचा आरोप नायकवडी यांनी केला आहे.

राज्यात चांगला साखर उतारा आणि चांगला दर यासाठी ख्यातकीर्त असलेला हुतात्मा कारखाना कर्जात असून या कर्जास अध्यक्ष नायकवडीच जबाबदार असल्याचा आरोप करून त्यांनी कारखान्याच्या अध्यक्षपदावरून पायउतार व्हावे, कारखान्यावरील कर्ज त्यांनी स्वतः फेडावे या मागणीसाठी किरण नायकवडी, केदार नायकवडी आणि गौरव नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली गेले दहा दिवस आंदोलन सुरू आहे. या आंदोलनामध्ये कारखान्याचे २१ पैकी १३ संचालक या सहभागी झाले असून दोन संचालक मृत आहेत. यामुळे संचालक मंडळातही अध्यक्ष नायकवडी यांनी बहुमत गमावले आहे.



पद्मभूषण नागनाथअण्णा नायकवडी यांनी या कारखान्याची उभारणी करून स्वतः पदापासून अलिप्त राहून सहकारातील आदर्श संस्था म्हणून कारखाना चालवला. मात्र, त्यांचे पुत्र वैभव नायकवडी यांनी कर्जमुक्त झालेला कारखाना पुन्हा कर्जबाजारी केला असून सध्या कारखान्यावर ४५० कोटींचे कर्ज आहे. कारखान्याच्या कामकाजात अन्य कुणालाही हस्तक्षेप करू दिला जात नसून एकहाती कारभार चालविला जात आहे. या कारखान्यातील साखरेचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार करण्यात आली असून उतारा व दरामध्ये सर्वोच्च असलेला हुतात्मा कारखाना आर्थिक डबघाईला येण्यास अध्यक्षच जबाबदार असल्याचा आरोप नायकवडी यांनी केला आहे.

अध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन कर्जफेड त्यांनी स्वतः करावी या मागणीसाठी सभासदांसह १३ संचालकांनी कारखाना कार्यस्थळावर ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. आंदोलकांच्या मागण्यांबाबत कोणतेही भाष्य करण्यास अध्यक्ष नायकवडी अद्याप पुढे आलेले नाहीत. तर आंदोलन मागे घ्यावे यासाठी विविध नेत्यांकडून मध्यस्थीचे सुरू असलेले प्रयत्न आंदोलकांनी फेटाळून लावले आहेत.

या आंदोलनात अध्यक्षांचे बंधू किरण नायकवडी, केदार नायकवडी, पुतणे गौरव नायकवडी यांच्यासह ॲड. वरुण माने, वसंत वाजे, पोपट अहिर, भीमराव अहिर, अरुण यादव, संजय अहिर, वैभव खोत, संदेश कांबळे, रामचंद्र भाडळकर, गंगाराम सूर्यवंशी, महादेव कांबळे आदींचा समावेश आहे.

# सुर्ली घाटात ब्रेक निकामी; आराम बस उलटली

**लोकसत्ता वार्ताहर**

**कराड :** गुहागर-विजापूर या महामार्गावर हैदराबादहून कराडकडे येणाऱ्या एका खासगी आराम बसला कराड तालुक्यातील सुर्ली घाटात एका तीव्र उतारावर ब्रेक निकामी झाल्याने भीषण अपघात झाला. चालकाचे नियंत्रण सुटलेल्या या बसने संरक्षक कठड्याला जोरदार धडक देऊन ती काही अंतरावर उलटली. सुदैवाने सर्व प्रवासी सुखरूप बचावले, मात्र चालक किरकोळ जखमी झाला.

ही घटना गुरुवारी सकाळी घडली. आराम बसमध्ये सात प्रवासी, चालक आणि वाहक (क्लिनर) असे एकूण नऊ जण प्रवास करत होते. घाटातील उतारावर अचानक ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि काही क्षणांतच अपघात घडला.

# सांगली पालिकेच्या विकासकामांबाबत बैठकीचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन



महापालिका क्षेत्रातील विविध प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महापौर धीरज सूर्यवंशी यांनी चर्चा केली.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**सांगली :** सांगली महापालिकेच्या विकासकामांबाबत मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात व्यापक बैठक घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याची माहिती महापौर धीरज सूर्यवंशी यांनी गुरुवारी दिली.

महापौर सूर्यवंशी यांनी मुंबईत मुख्यमंत्री फडणवीस यांनी शहराच्या विकासकामांबाबत चर्चा करून सुमारे ६०० कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. यावेळी याबाबत मे महिन्याच्या १० अथवा १२ तारखेला व्यापक बैठक घेऊन विकासकामे मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याचे सूर्यवंशी यांनी सांगितले.

सांगली, मिरज व कुपवाड या तीन शहरांतील रस्ते विकास, पाणीपुरवठा योजना आणि शहराच्या पायाभूत सुविधांसाठी आवश्यक असलेल्या निधीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांचे लक्ष वेधले.

तसेच सांगली शहराच्या आरोग्य आणि स्वच्छतेसाठी कळीचा मुद्दा ठरलेला शेरीनाल्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याबरोबरच शहराचा पाणीप्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी 'वारणा उद्भव योजना' जलदगतीने पूर्ण करण्याबाबत प्राथमिक स्वरूपात चर्चा करण्यात आली. महापालिकेसाठी प्रशासकीय इमारत उभारणीबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली, अशी माहिती महापौर सूर्यवंशी यांनी दिली. शहरातील अंतर्गत रस्त्याचे जाळे उभारण्याची गरज असून यासाठी भरीव निधीची गरज आहे. याकडेही मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधण्यात आले असून या सर्व प्रलंबित प्रश्नाबाबत बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिल्याचे महापौरांनी सांगितले.

# साताऱ्यातील आठ पोलीस अधिकारी - कर्मचाऱ्यांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

**सातारा :** साताऱ्यातील आठ पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले आहे. त्यांना हा मानाचा सन्मान जाहीर झाला आहे. या सन्मानचिन्हांचे वितरण आज (शुक्रवारी) करण्यात येणार आहे.

सातारा जिल्ह्यातील सन्मानित अधिकारी व कर्मचाऱ्यांत पोलीस शिपाई तुषार हणमंत भोसले, पोलीस हवालदार संजय बाळासो साळुंखे, पोलीस हवालदार गजानन आप्पासाहेब तोडकर, पोलीस हवालदार राहुल बापू खाडे, पोलीस नाईक स्वप्निल चंद्रकांत शिंदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक इसाक मुबारक मुलाणी, गुप्तवार्ता अधिकारी नंदकिशोर दत्तात्रय कदम आणि पोलीस उपनिरीक्षक सय्यदकरीम इनामदार.

राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखताना उल्लेखनीय कार्य करणारे तसेच राष्ट्रपती गुणवत्ता पूर्ण सेवा पदक व शौर्य पदकप्राप्त अधिकारी-अंमलदार यांचा या सन्मानासाठी समावेश करण्यात आला आहे. विविध प्रवर्गांमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना गौरविण्यात येत आहे.

पोलीस महासंचालकांनी सर्व सन्मानित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या सन्मानामुळे पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना अधिक प्रेरणा मिळून नागरिकांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्य करण्यास प्रोत्साहन मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

शासनाच्या गृह विभागाच्या विविध शासन निर्णयांच्या आधारे राज्यातील पोलीस दलातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा सन्मान जाहीर करण्यात आला असून, सन २०२५ साठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**अंचल कार्यालय दबावग्रस्त अस्ति वसूली शाखा पुणे**

पहिला मजला, अतूर चेंबर्स, एसजीएस मॉल समोर, पुणे कॅम्प, पुणे 411001

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

"परिशिष्ट-IV-A [नियम 8 (6) ची तरतूद पहा]

**सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन अॅन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल अॅसेटस अॅन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/s/गहाणदार/जमीनदार/s/सुरक्षित मालमत्ता/s/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

| अनु./ लॉट क्र. | कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता | स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार) | एकूण देय. | 1. राखीव किंमत 2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी) 3. बिड वाढीव रक्कम | 1.ई-लिलावाची तारीख ई-लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ 2 . बोली आणि ईएमडी सादर करण्याची अंतीम तारीख आणि वेळ | ताब्यात घेण्याची स्थिती (रचनात्मक/ वास्तविक) | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मेसर्स युनायटेड थर्मोकोटस्, भागीदार :1) श्री. अभिजित अरुण कुलकर्णी 2) श्री. विनय दत्तात्रय दीक्षित, जमानतदार : 1) श्री अरुण परशुराम कुलकर्णी 2) श्री अभिजित अरुण कुलकर्णी. 3) श्री विनय दत्तात्रय दीक्षित. 4) श्री सतीश विष्णू सहस्त्रबुद्धे, 5) श्री मनीष माधव कट्टी | सर्व भाग आणि तुकडा असलेले फॅक्ट्री जमिन आणि बिल्डींग बांधकामासह **प्लॉट नं. 118/119** वर, गट नं. 942, सेक्टर बी, फर्स्ट फेज श्री लक्ष्मी को-ऑप,औद्योगिक वसाहत स्थित हातकणगळे, जिल्हा कोल्हापूर आणि क्षेत्रफळ 1065 चौ.मी. संपत्ती मेसर्स युनायटेड थर्माकोटस् यांच्या मालकीचे. **(बोझा ज्ञात नाही)** | रु. 1,21,04,490.00 + लागु न झालेले व्याज + कायदेशिर आणि ईतर शुल्क | रु. 50,03,000/-<br>रु. 5,00,300/-<br>रु. 1,00,000/- | 21/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>21/05/2026 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 19/05/2026 रोजी 12:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत श्री. सनातन कुमार 8951244883 |
| 2 | मेसर्स सह्याद्री ऍग्रो इंडस्ट्रीज, 1) श्री. संजय शंकरराव पाटील, (कर्जदार) जमानतदार : 1) सविता संजय पाटील, (मृतक श्री. संजय वसंत पाटील यांचे कायदेशीर वारस) 2) श्री. दत्तात्रय मोहन गायकवाड | 1. सर्व भाग आणि तुकडा असलेले फॅक्ट्री जमिन आणि बिल्डींग/ शेड/ गोडाऊन स्थित **गट नं. 279,** लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, सागर कोल्ड स्टोरेजसमोर, गाव पुनाडी, ताल तासगाव जिल्हा सांगली. क्षेत्रफळ 0एच 83 आर, संपत्ती श्री. संजय शंकरराव पाटील यांच्या नावे **(बोझा ज्ञात नाही)**<br>2. सर्व भाग आणि तुकडा असलेले जमिन स्थित **गट नं. 264**, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, सागर कोल्ड स्टोरेजसमोर, गाव पुनाडी, ताल तासगाव जिल्हा सांगली. क्षेत्रफळ 1एच 15 आर, संपत्ती श्री. संजय शंकरराव पाटील यांच्या नावे. **(बोझा ज्ञात नाही)**<br>3. सर्व भाग आणि तुकडा असलेले जमिन स्थित **गट नं. 278,** लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, सागर कोल्ड स्टोरेजसमोर, गाव पुनाडी, ताल तासगाव जिल्हा सांगली. क्षेत्रफळ 1 एच 13आर पैकी 0एच 53 आर असलेले संपत्ती श्री. संजय शंकरराव पाटील यांच्या नावे **(बोझा ज्ञात नाही)** | रु. 7,15,29,930.00 + लागु न झालेले व्याज + कायदेशिर आणि ईतर शुल्क | 1. रु. 2,26,65,000/-<br>रु. 22,66,500/-<br>रु. 1,00,000/-<br>2. रु. 1,26,27,000/-<br>रु. 12,62,700/-<br>रु. 1,00,000/-<br>3. रु. 66,78,000/-<br>रु. 6,67,800/-<br>रु. 1,00,000/- | 21/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>21/05/2026 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 18/05/2026 रोजी 12:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत श्री. सनातन कुमार 8951244883 |
| 3 | संजय शंकरराव पाटील (कर्जदार) जमानतदार: संजय वसंत पाटील (मृतक) कायदेशीर वारस: सविता वसंत पाटील आणि श्रीमती राणी संजय पाटील | सर्व भाग आणि तुकडा असलेले फॅक्ट्री जमिन आणि बिल्डींग/ शेड/ गोडाऊन असलेले **गट नं. 280**, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट, सागर कोल्ड स्टोरेज समोर गाव पुनाडी, तालुका तासगाव, जिल्हा सांगली, क्षेत्रफळ एरीया 0एच, 40आर संपत्ती श्री. संजय शंकरराव पाटील यांच्या नावे **(बोझा ज्ञात नाही)** | रु. 1,61,45,327.00 + लागु न झालेले व्याज + कायदेशिर आणि ईतर शुल्क | रु. 1,19,82,600/-<br>रु. 11,98,260/-<br>रु. 1,00,000/- | 21/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>21/05/2026 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 18/05/2026 रोजी 12:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत श्री. सनातन कुमार 8951244883 |
| 4 | मेसर्स एस. के. संस्कृती मोटर्स प्रायव्हेट लिमिटेड संचालक : 1) श्री.संतोष रम्यश पांडे 2) श्री. अशोक रम्यश पांडे जमानतदार : श्री रम्यश पांडे | सर्व भाग आणि तुकडा असलेले संपत्ती म्हणजे जमीन असलेले **एस नं. 278**, हिस्सा नं. 1+2/ 1+2/2/3/1, क्षेत्रफळ एरीया जवळपास 5000 चौ.फुट, म्हणजे 464.68 चौ.मी. त्यावरील बिल्डींग बांधकामासह उभी असलेली स्थित गाव लोहेगाव, तालुका हवेली, जिल्हा पुणे, नोंदणीकृत जिल्हा पुणेच्या हद्दित असलेले उप-जिल्हा, तालुका हवेली आणि जिल्हा परिषद पुणे, तालुका हवेली पंचायत समिती पुणे ग्रामपंचायत लोहेगाव. संपत्ती श्री. रम्यश पांडे यांच्या मालकीचे. **(बोझा ज्ञात नाही)** | रु. 1,72,82,014.00 + लागु न झालेले व्याज + कायदेशिर आणि ईतर शुल्क | रु. 1,69,00,000/-<br>रु. 16,90,000/-<br>रु. 1,00,000/- | 21/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>21/05/2026 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 15/05/2026 रोजी 12:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत श्री. सनातन कुमार 8951244883 |
| 5 | मेसर्स एस.एस. ट्रेडर्स प्रोप्रा. श्री. प्रकाश संपतराव चोरगे गट नं. 185/1, मिळकत नं. 173 पडेगाव,ता. खंडाळा, जि. सातारा, महाराष्ट्र-415521. | नोंदणीकृत इक्वीटेबल गहाण असलेले निवासी **एनए प्लॉट नं. 51** वरील सर्व्हे नं. 7/10/1, प्लॉट नं. 5 ते 17, 19 ते 25, 40 ते 42, 44, 45, 66 ते 69, 70, 71, 186, 187, 193, 194, 290 ते 296, 298 ते 302 (एकुण 47 प्लॉट्स) काळभैरवनाथ मंदिर जवळ, गाव भांबे आणि सर्वे नं. 40/1, प्लॉट नं. 1 ते 4 (एकुण 04 प्लॉट्स), गाव बामणेवाडी तालुका पाटण, जिल्हा सातारा - 415206. संपत्ती श्री. प्रकाश संपतराव चोरगे यांच्या नावे. क्षेत्रफळ एरीया 20771.79 चौ.मी. **(वास्तविक ताबा) (बोझा ज्ञात नाही)** | रु. 5,47,49,654.26 + लागु न झालेले व्याज + कायदेशिर आणि ईतर शुल्क | रु. 2,35,00,000/-<br>रु. 23,50,000/-<br>रु. 1,00,000/- | 21/05/2026 रोजी 14:00:00 ते 18:00:00 वा. पर्यंत<br>21/05/2026 18:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 15/05/2026 रोजी 12:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत श्री. अमोल देशपांडे 7875557737 |

**टीप:** विक्री अंतर्गत असलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोणतेही शुल्क, धारणाधिकार, भार, मालमत्ता कर देयके, वीज देयके इत्यादी किंवा सरकार, स्थानिक प्राधिकरण किंवा कोणाकडेही असलेल्या इतर कोणत्याही देयकांसाठी अधिकृत अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया **https://www.bankofbaroda.in/e-auction.htm** आणि ऑनलाइन लिलाव पोर्टल **https://baanknet.com** या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच संभाव्य बोलीदार **श्री. मधुसूदन कुमार एम. (सहाय्यक जनरल मॅनेजर आणि अधिकृत अधिकारी)** यांच्याशी दूरध्वनी क्रमांक : **020-29982037, मोबाईल क्रमांक : +91 8722317555, 954543811,7875557737,8951244883** वर संपर्क साधू शकतात.

**येथे स्कॅन करा तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी.**

**दिनांक : 30/04/2026**
**स्थळ : पुणे**

**(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)**

**श्री. मधुसूदन कुमार एम.**
**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडोदा, झेडओ एसएआरबी पुणे.**

**महात्मा फुले नविनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित**

महाप्रित

(म.फु.मा.वि.म. ची उपकंपनी, महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**स्वारस्य अभिव्यक्तीची सूचना**

महाप्रित **खालील कामांसाठी** सल्लागार / रिटेनर / कंत्राटी (आवश्यकतेनुसार) तत्त्वावर **(१) प्रमुख संसाधन व्यक्ती (रसायने आणि खते) आणि (२) प्रमुख संसाधन व्यक्ती (विद्युत नियामक बाबी) यांच्या निवडीसाठी स्वतंत्रपणे** स्वारस्य अभिव्यक्ती (EoI) आमंत्रित करीत आहे.

१) महाप्रितला रसायन आणि खत व्यवसाय स्थापित व कार्यान्वित करण्यासाठी त्याचबरोबर खत व्यापार व्यवसाय, वितरण आणि खते व विविध रसायनांचा प्रचार यांचा समावेश आहे अश्या क्षेत्रांमध्ये सल्ला आणि सहाय्य देण्याकरिता.

२) महाप्रितला विद्युत नियामक बाबी आणि मान्यता, नवीकरणीय ऊर्जेसाठी वीज खरेदी करार, बाजार एकीकरण, भागधारक समन्वय, व्यावसायिक धोरण आणि वीज व्यापार, इ. करिता सल्ला आणि सहाय्य देण्याकरिता.

प्रस्ताव सादर करण्याचा अंतिम दिनांक **१५/०५/२०२६** आहे. स्वारस्य अभिव्यक्तीचे तपशील **https://mahapreit.in/** या संकेतस्थळावर पाहता येतील.

**कार्यकारी संचालक (प्रशासन)**

बँक ऑफ महाराष्ट्र Bank of Maharashtra भारत सरकार का उद्यम एक परिवार एक बैंक

**हाऊसिंग फायनान्स शाखा**–११२९, यशोमंगल, ११८३–ए, १ ला मजला, एफ. सी. रोड, शिवाजीनगर, पुणे – ५. **फोन :** ०२०–२५५३०००२

**ई–मेल :** bom1129@bankofmaharashtra.bank.in
brmgr1129@bankofmaharashtra.bank.in

**ताबा नोटीस (अपेंडिक्स IV ॲक्ट रुल ८ (१) नुसार )**

ज्याअर्थी खाली सही करणार **बँक ऑफ महाराष्ट्रचे** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (२००२ चा ५४) च्या सेक्शन १३(१२)आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ च्या रुल ३ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार **१) कु सोनाली हेमचंद्र राऊत (सौ. सोनाली शैलेश मोरे) आणि सह–कर्जदार २) श्री. शैलेश अरुण मोरे** आणि **३) श्रीमती छाया अरुण मोरे** यांना **दि. १७/०२/२०२६ रोजी मागणी नोटीस** बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीमध्ये नमूद केलेली बँकेला येणी असलेली रक्कम **रु. १,१०,४४,३२८/–(रुपये एक कोटी दहा लाख चव्वेचाळीस हजार तीनशे अठ्ठावीस फक्त) अधिक त्यावरील ९.०५% दराने लागू न केलेले वार्षिक व्याज, दि. १७/०२/२०२६ पासूनच्या मासिक येण्यासहीत, तसेच सदर संपूर्ण रक्कम परत करेर्यंतचे दंडात्मक व्याज, किंमत आणि खर्च वजा वसुली जर तर** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत परत करावी. सदर नोटीस रजिस्टर्ड एडी पोस्टाने पाठविण्यात आली होती.

कर्जदार **१) कु सोनाली हेमचंद्र राऊत (सौ. सोनाली शैलेश मोरे) आणि सह–कर्जदार २) श्री. शैलेश अरुण मोरे** आणि **३) श्रीमती छाया अरुण मोरे** सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्याने, विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) व रुल ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून, खाली नमूद केलेल्या मालमत्तेचा **दि. २८ एप्रिल २०२६ रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.**

विशेषत: कर्जदार व सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **बँक ऑफ महाराष्ट्र, हाऊसिंग फायनान्स शाखा** यांना वर नमूद केलेल्या येणे असलेल्या रक्कमेच्या अधीन राहील.

सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सदर कायद्याच्या सब–सेक्शन (८) सेक्शन १३ अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.

सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्ये सुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही प्रकारच्या स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरली जाईल.

**बँकेकडे गहाणतारण असलेल्या आणि बँकेने ताबा घेतलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे :–**

रहिवासी अपार्टमेंटचा सर्वसामाईक भाग, फ्लॅट नं. ११०३, बिल्डींग ए, साहिल हाईटस् को ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, सर्व्हे नं. ६/२/१+२/३/२ आणि सर्व्हे नं. ७ व ७ए, गंगा पनामाजवळ, पिंपळे निलख, पुणे–४११०२७ येथे.

**दिनांक : २८/०४/२०२६**
**ठिकाण : पुणे**

**मुख्य प्रबंधक आणि अधिकृत अधिकारी,**
**बँक ऑफ महाराष्ट्र**

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India A Government of India Undertaking

**ऋण वसुली आणि विधी विभाग**

प्रादेशिक कार्यालय : ४११ आणि ४१२, ४था मजला, कॅनॉट प्लेस, बंडगार्डन रोड, वाडिया कॉलेज जवळ, पुणे– ४११००१, महाराष्ट्र.
मोबाईल: ९४२०७५५८४१/ ९३९१३१५००६

**वाहनांसाठी लिलाव सूचना**

**वाहनांच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

युनियन बँक ऑफ इंडिया (बँक) द्वारे वित्तपुरवठा केलेले आणि संबंधित कर्जदार/जामीनदाराकडून जप्त केलेले खालील वाहन विक्रीसाठी उपलब्ध आहेत. वाहने खरेदी करण्यास इच्छुक व्यक्ती वाहनांची प्रत्यक्ष तपासणी आणि तपशीलांसाठी अधोस्वाक्षरीकर्त्याशी संपर्क साधू शकतात. इच्छुक खरेदीदारांनी त्यांचे ऑफर लेटर, रिफंडेबल/अॅडजस्टेबल बँकर्स चेक किंवा वाहनासाठी ईएमडी (कमाईची रक्कम ठेव) साठी पे ऑर्डरसह सादर करावे, जे युनियन बँक ऑफ इंडियाच्या नावे असेल आणि खाली नमूद केल्याप्रमाणे व्याजमुक्त बयाणा रक्कम ठेव म्हणून पुणे येथे देय असेल. इच्छुक खरेदीदारांनी त्यांचे ऑफर सीलबंद लिफाफ्यांमध्ये सादर करावेत ज्यावर ''वाहन क्रमांक....................खरेदीसाठी कोटेशन'' असे लिहिलेले असेल आणि ते १५–०५–२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत अधोस्वाक्षरीकर्त्याकडे पोहोचले पाहिजेत. सीलबंद कोटेशन आमच्या खाली नमूद केलेल्या शाखांमध्ये १५–०५–२०२६ रोजी दुपारी ४:०० वाजता उघडले जातील आणि ज्या इच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या ऑफर सादर केल्या आहेत त्यांनी त्या वेळी उपस्थित राहणे पसंत करावे. यशस्वी बोलीदारांना कोटेशन उघडल्याच्या तारखेपासून १० (दहा) कामकाजाच्या दिवसांच्या आत किंवा बँकेने वाढवलेल्या कोणत्याही वेळेच्या आत संपूर्ण किंमत जमा करावी लागेल, अन्यथा ईएमडी जप्त केली जाईल आणि वाहन(ती) ताबडतोब विकले जातील. वाहने ''जशी आहे आणि जिथे आहे'' या तत्वावर विकली जात आहेत आणि बँकेने निश्चित केलेल्या राखीव किंमतीपेक्षा कमी किंमतीत विकली जाणार नाहीत. कोणतेही कारण न देता सर्व किंवा कोणत्याही ऑफर स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार अधोस्वाक्षरीकर्त्याकडे राखून आहे.

| अनु. क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | वसुलीसाठी देणी | वाहनाची संक्षिप्त माहिती | ताब्या प्रकार | राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव | लिलावाचे ठिकाण / तपासणी आणि ईएमडी भरण्यासाठी संपर्क तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| | (ए) | (बी) | (सी) | (डी) | (ई) | (एफ) |
| १. | **कर्जदार/गहाणदार : श्री.विकी मुकुंद रांजणे (खंडाळा पारगाव शाखा ७०८००)** | रू. १९.१६ लाख आणि त्यावरील व्याज आणि खर्च | **i)** वाहन तपशील – चारचाकी वाहन **ii)** नोंदणी क्रमांक – MH-WJ-9508 **iii)** नोंदणी तारीख – ०७.०६.२०२४ **iv)** उत्पादन वर्ष – २०२४ **v)** मॉडेल आणि रंग– टाटा मोटर्स सिटी राइड प्राइम SKL41+A+D LP 412 बस **vi)** चेसिस क्रमांक – MAT805023RFD05843 **vii)** इंजिन क्रमांक – 4SPCR19DVX611547 **viii)** विमा – डिसेंबर २०२५ रोजी कालबाह्य झाला **ix)** इंधन वापर – डीझेल **x)** बसण्याची क्षमता – ४२+१ **xi)** इंजिन क्षमता – 125 BHP **xii)** वापर – व्यावसायिक वापर | प्रत्यक्ष | राखीव किंमत रु. १५,२०,०००.०० बयाणा रक्कम रु. १,५२,०००.०० | शाखा–खंडाळा पारगाव शाखा व्यवस्थापक– मृत्युंजय गौतम मोब क्र. ९६८७६७३६१३ |

लिलावाची तारीख १५.०५.२०२६ दुपारी ४:०० वाजता लिलावाचे ठिकाण वर नमूद केल्याप्रमाणे
बोली सादर करण्याची शेवटची तारीख १५.०५.२०२६ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत)
तपासणीची तारीख आणि वेळ १३.०५.२०२६

दिनांक : ३०.०४.२०२६
स्थळ : पुणे

लिलाव / विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, बोली फॉर्म आणि इतर कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया आमच्या वर उल्लेख केलेल्या शाखांशी संपर्क साधा.
सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्येसुद्धा प्रसिद्ध करण्यात येते. कोणत्याही स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.

अधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया